# आदेश निशाणी क्र.३७ वर.

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, गट क्र.३९१ व ३९१/२—अ या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकात प्रतिवादी क्र.१ चे नाव होते. प्रतिवादी कैफियतमध्ये यदावा मिळकती दि.२/९/२०१३ रोजी सौ. रजनी पंढरीनाथ देवरे म्हणजेच प्रतिवादी क्र.१ चे पत्नीच्या नावाने नोंदणीकृत खरेदीखताने लिहुन दिले. त्यानुसार सौ. रजनी यांच्या नावाची नोंद महसुल पत्रकात लागलेली आहे. त्यामुळे प्रस्तत दाव्यात त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामिल करणे आवश्यक आहे. तसेच वादीचे असेही कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ हा खरेदीखताने दावा मिळकती हया स्वकष्टार्जित मिळकती आहेत असा प्रयत्न करीत आहे. सदर खरेदीखत हे पोकळ व नाममात्र आहे. या अनुषंगाने दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ याने निशाणी क्र. ३९ वर म्हणणे दाखल केले. प्रस्तत अर्जास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादीने अर्जातील सर्व कथन हे साफपणे नाकारले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर मिळकती हया त्यांचे स्वकष्टार्जित मिळकती आहेत. दावा दाखल करण्यापुर्वी सदर मिळकती विक्री केल्या आहेत. त्यानुसार ७/१२ पत्रकावर नोंदीही झालेल्या होत्या. सदर खरेदीखताची माहिती ही वादीला असुनही वादीने दावा दाखल झालेनंतर प्रतिवादी क्र.१ च्या पत्नीचे नाव ७/१२ पत्रकावर लावले असे खोटे नमुद करीत आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज हा रद्य करणेस विनंती आहे.

४. या कामी मी वादपत्र व कैफियत तसेच दोन्हीही पक्षकारांतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने

सरसनिरस मानाने दावा मिळकतीची वाटणी होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. गट क्र.३९१/१ व ३९१/२—अ या मिळकतीसुध्दा दाव्यातील विषय आहे. वादीने निशाणी क्र. ३ सोबत दस्तऐवज सदर मिळकतीचे ७/१२ पत्रक दाखल केलेले आहे. या कागदपत्राचे अवलोकन केले असता दावा दाखल करतांना प्रतिवादी क्र.१ यांचे एकटयाचेच नांव सदर मिळकतीवर दिसुन येते. सदर ७/१२ पत्रक हे दिनांक २८/११/२०१३ रोजीचे आहे. खरेदीखत हे दि. ०२/०९/२०१३ रोजीचे आहे. म्हणजेच तथाकथित खरेदीखताची नोंद ही महसुल पत्रकात त्वरीत झालेली दिसुन येत नाही. त्यामुळे मला वादीच्या कथनात तथ्य दिसुन येते.

५. तथाकथित खरेदीखत हे दावा दाखल करण्यापूर्वीचे असल्याने खरेदीदार सौ.रजनी पंढरीनाथ देवरे हे या प्रकरणात आवश्यक पक्षकार आहे असे स्पष्ट होते. प्रस्तुतचे प्रकरण हे अद्याप चौकशीसाठी नेमण्यात आलेले नाही त्यामुळे जर वादीस दावा कलम दुरूस्त करण्यास परवानगी दिली तर प्रतिवादीचे नुकसान होणार नाही या उलट दावा निकाली करण्यास मदतच होईल. करीता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करणे न्यायाचे होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे :—

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येते.

२. वादीने आदेश तारखेपासुन १४ दिवसात दाव्यात दुरूस्ती करावी.

३. दुरूस्त दाव्याच्या नकला या आदेश तारखेपासुन १४ दिवसाच्या आत दाखल कराव्या.

दिनांक १०/०९/२०१५ ( प.घ.तापडीया )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,सटाणा.